# वसई-विरार शहर महानगरपालिका

## महिला व बालकल्याण विभाग

## मुख्य कार्यालय, विरार

दिनांक :- १७/१०/ २०२४

**प्रेसनोट**

वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना दरवर्षी दप्तर,छत्री,रेनकोट,कंपास बॉक्स,वह्या,कलर पेटी,वॉटर कलर,पेन्सील बॉक्स,ड्राँईग बुक इत्यादी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येत आहे.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर,छत्री,रेनकोट,कंपास बॉक्स,वह्या,कलर पेटी,वॉटर कलर,पेन्सील बॉक्स,ड्राँईग बुक इत्यादी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येत आहे.**गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,वसई यांनी प्रमाणित करुन दिल्यानूसार महानगरपालिका हद्दीतील ११८ शाळेंमधील २२९१२ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येत आहे.**याकामी ई-निविदा मागविण्यात आल्या असून सदर कामाकरीता ०५ ई-निविदाधारकांनी ई-निविदे मध्ये सहभाग घेतला होता,त्यापैकी ०३ ई-निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरविण्यात आल्या असून ०२ निविदा तांत्रिक दृष्ट्या अपात्र ठरविण्यात आल्या आहेत.त्यानुसार L१ दराच्या निविदाधारकांची निविदा मंजूर करण्यात आली आहे.

**सन २०२४-२५ मधील लोकसभा सार्वत्रिक निवडणूक व त्यानंतर कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूकीची आचरसंहिता लागल्यामुळे** तसेच शालेय साहित्य शासनाच्या अधिकृत लॅबोरेटरी मधून तपासणी करणे या कारणास्तव सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात शैक्षणिक साहित्य वाटपाकरीता उशिर झाला आहे.

**मंजूर निविदाधारकांस दिनांक.१०/०९/२०२४ रोजी शैक्षणिक साहित्य वाटपा बाबत कार्यादेश देण्यात आले आहेत.त्यानुसार मंजूर ठेकेदारामार्फत महानगरपालिका हद्दीतील बहुतांश शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप झाले आहे व उर्वरीत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना लवकरात लवकर शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येईल व सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातील शैक्षणिक साहित्य वाटपामध्ये कोणतीही अनियमिता झालेली नाही.**

**महिला व बालकल्याण विभाग**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**